महत्त्वाचे



# मेट्रो-३ ने गाठला भुयारीकरणाचा २९ वा टप्पा!

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

कुलाबा ते सीप्झ या मेट्रो ३ मार्गासाठी मिठी नदी खालील भुयारीकरणाचा २९ वा टप्पा पूर्ण करण्यात एमएमआरसीएलला यश आले आहे. नदीपात्रापासून १४ मीटर खोल व जमिनीपासून साधारणपणे २५ मीटर खोल भागात बीकेसी ते धारावीपर्यंतचे १.५ किमी इतके अंतर अवाढव्य गोदावरीत ४ या टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) द्वारे हे काम पूर्ण तब्बल ३६३ दिवसांत पूर्ण करण्यात आले आहे. सध्या मेट्रो ३ प्रकल्पात १७ टीबीएम कार्यरत असून भुयारीकरणाचे काम ८५% तर एकूण बांधकाम ५९% पूर्ण झाले आहे.

- मेट्रो टनेलचा मार्ग मिठी नदीखालून १.५ किमीचे २ भुयार आणि १५४ मीटरचे तिसऱ्या भुयाराचा वापर स्टॅबलिंग लाईनसाठी करण्यात येणार आहे. बीकेसी स्थानकापासून काही मेट्रो रद्द होऊन पुन्हा परत जाणार आहे. रद्द केलेल्या मेट्रो टनेलचा मार्ग बदलण्यासाठी या मार्गाचा उपयोग करण्यात येणार आहे.

टेरार्टेक-निर्मित गोदावरी-४ या टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) द्वारे बीकेसी ते धारावीपर्यंतचे १.५ किमी अंतर पूर्ण केले. बीकेसी येथील लाँचिंग शाफ्टपासून २१ ऑगस्ट २०१९ रोजी गोदावरी-४ चे काम चालू करण्यात आले आणि धारावीपर्यंत १,०४३ आरसीसी रिंग्ससह भुयार आकारले गेले. कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गाचा हा २९ वा भुयारीकरणाचा टप्पा आहे.

मिठी नदीखालील भुयारीकरण मेट्रो-३ प्रकल्पातील सर्वात आव्हानात्मक कामांपैकी एक होते. मुंबईतील गुंतागुंतीची भौगोलिक रचना, भूगर्भातील पाण्याची उच्च पातळी शिवाय कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे येणाऱ्या मर्यादा यामुळे हे काम अधिकच कठीण होते, मात्र आमच्या टीमने हे शिवधनुष्य यशस्वीपणे पार पाडले याचा आनंद आहे असे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल म्हणाले.

यावर्षी मार्च महिन्यात गोदावरी-३ ने बीकेसी ते धारावीपर्यंत १.५ किमी डाऊन मार्गाचे भुयारीकरण पूर्ण केले होते. बीकेसी ते धारावीपर्यंतच्या एकूण ३ किमी (अप आणि डाऊनलाइन) पैकी ४८४-मीटर भुयार सक्रिय मिठी नदीच्या पात्राखाली आहे.

धारावी, बीकेसी, विद्यानगरी व सांताक्रूझ स्थानकांचा समावेश असलेल्या पॅकेज-५ ने संपूर्ण ८ किमी लांबीचे भुयार पूर्ण केले आहे. प्रकल्पाचे आतापर्यंत १७ टीबीएमच्या मदतीने जवळपास ८५% भुयारीकरण आणि एकूण ५९% बांधकाम पूर्ण केले आहे.